**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, JAN–FEB, 2018, VOL- 5/43*

# पुणे जिल्हा परिषद अर्थसंकल्प –शिक्षणविषयक तरतूदी व प्रत्यक्ष खर्च

**डॉ दिगंबर दुर्गाडे**, सहयोगी प्राध्यापक, टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे

***Abstract***

*पुणे जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पामध्ये सन २०११–१२ ते २०१५–१६ या कालावधीमध्ये शिक्षणासाठी केलेल्या आर्थिक तरतूदींपैकी प्रत्यक्षात किती रक्कम खर्च झाली याचा अभ्यास केला असता २०११–१२ मध्ये शिक्षण विभागासाठी केलेल्या तरतूदींपैकी प्रत्यक्षात फक्त २४.४३ टक्के खर्च झाला आहे तर २०१२–१३ मध्ये ४३.२३ टक्के, २०१३–१४ मध्ये ४३.६० टक्के, २०१४–१५ मध्ये ६७.६६ टक्के, २०१५–१६ मध्ये ४३.१२ टक्के, इतकाच खर्च प्रत्यक्षात झालेला आढळला. २०११–१२ ते २०१५–१६ या आर्थिक वर्षामध्ये एकाही वर्षी शिक्षणासाठी केलेल्या एकूण तरतूदींच्या १०० टक्के खर्च झालेला नाही. मोठया प्रमाणावर रक्कम अखर्चित आहे. परिणामी ज्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी अर्थसंकल्पांमध्ये तरतूद केलेली आहे ती उद्दिष्टे रक्कम पूर्णपणे खर्च झाली नाही तर साध्य नाहीत. त्यासाठी पुणे जिल्हा परिषदेने अर्थसंकल्पामध्ये शिक्षण विभागासाठी केलेल्या आर्थिक तरतूदींची संपूर्ण रक्कम खर्च करणेत येणारे अडथळे दूर करणे गरजेचे आहे.*

पुणे जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात केलेल्या शिक्षण विषयक तरतुदी, प्रत्यक्ष खर्च यासाठी दस्तऐवज नोंदपत्रिका या साधनाव्दारे माहितीचे संकलन केले. त्यासाठी पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०११–१२ ते सन २०१५–१६ या पाच वर्षाच्या कालावधीतील अर्थसंकल्प, प्रदाने व लेखा शीर्षांचा विचार केलेला आहे. दस्तऐवज नोंद पत्रिकेव्दारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन केले आहे.

## पुणे जिल्हा परिषदेच्या २०११–१२ ते २०१५–१६ च्या अर्थ संकल्पामधील शिक्षण विभागासाठी केलेल्या तरतूदींपैकी प्रत्यक्षात झालेल्या खर्चाची तुलना

| अ.क्र | आर्थिक वर्ष | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ | २०१४–१५ | २०१५–१६ |
|---|---|---|---|---|---|---|
| | तरतूद रक्कम | ११६१२९००० | १६,७५,६०,००० | २९,३२,२३,१७५ | २५,१७,४०,००० | २४,४९,००,००० |
| | प्रत्यक्षात खर्च | २,८३,६३,२२८ | ७,२४,४१,३४० | १२,७८,४६,६३८ | १७,०३,२०,५३६ | १०,५६,०८,४५१ |
| | प्रत्यक्ष खर्चाची टक्केवारी | **२४.४२** | **४३.२३** | **४३.६०** | **६७.६६** | **४३.१२** |
| १ | अखर्चित रक्कम | ८,७७,६५,७७२ | ९,५१,१८,६६० | १६,५३,७६,५३७ | ८,१४,१९,४६४ | १३,९२,९१,५४९ |
| २ | अखर्चित रकमेची शेकडेवारी | ७५.५८ | ५६.७७ | ५६.४० | ३२.३४ | ५६.८८ |

पुणे जिल्हा परिषदेच्या २०११–१२ ते २०१५–१६ या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये शिक्षण विभागासाठी केलेल्या तरतूदींपैकी संबंधित पाच आर्थिक वर्षाच्या शेवटी प्रत्यक्षात झालेल्या खर्चाची सरासरी फक्त ४१.४१ टक्के इतकी आहे. याचाच अर्थ जरी अर्थसंकल्पामध्ये तरतूदी केलेल्या असल्या तरी प्रत्यक्षात ५८.५९ टक्के इतकी रक्कम अखर्चित आहे. परिणामी ज्या उद्‌देशाने वरील तरतूदी केलेल्या आहेत तो उद्‌देश पूर्णपणे साध्य झालेला नाही.

पाच वर्षामध्ये जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात शिक्षणासाठी १,०७,३५,५२,१७५ रूपयांची एकूण तरतूद केलेली होती. मात्र या कालावधीमध्ये फक्त ४४,४५,८०,१९३ इतकाच खर्च प्रत्यक्षात झालेला दिसून येतो. याचाच अर्थ अभ्यासाच्या आर्थिक वर्ष २०११–१२ ते २०१५–१६ या पाच वर्षामध्ये शिक्षणासाठी केलेला एकूण तरतूदींपैकी ६२,८९,७१,९८२ एवढी रक्कम खर्च झालेली नाही. या गोष्टीचा विचार करता पुणे जिल्हा परिषदेने शिक्षणासाठी केलेल्या तरतूदीचा प्रत्यक्ष

खर्च त्या त्या वर्षामध्येच करण्याकडे काटेकोर लक्ष देणे गरजेचे आहे. अन्यथा ज्या उद्देशाने तरतूदी केल्या आहेत तो उद्देश साध्य होणे शक्य होणार नाही.

२०११–१२ ते २०१५–१६ या आर्थिक वर्षामध्ये पुणे जिल्हा परिषदेने शिक्षणासाठी केलेल्या तरतूदीपैकी प्रत्यक्षातील सर्वाधिक खर्च सन २०१४–१५ या आर्थिक वर्षामध्ये केलेला आहे. या वर्षी २५,१७,४०,००० रूपयांच्या तरतूदीपैकी प्रत्यक्षात खर्च १७,०३,२०,५३६ रूपयांचा झालेला आहे. हे प्रमाणा या वर्षीच्या तरतूदीच्या ६७.६६ आहे. तर याच पाच वर्षाच्या कालावधीमध्ये सर्वात कमी खर्च त्या वर्षीच्या तरतूदींच्या तुलनेत २०१५–१६ या वर्षी झालेला दिसून येतो. या वर्षी प्रत्यक्षात आर्थिक वर्षाच्या शेवटी केलेला खर्च फक्त ४३.१२ टक्के आहे. म्हणजेच ५६.८८ टक्के रक्कम खर्च झालेली नाही. उर्वरित ३ आर्थिक वर्षामध्ये म्हणजेच सन २०११–१२, २०१२–१३ आणि २०१३–१४ या कालावधीत तरतूदींच्या तुलनेत प्रत्यक्षातील खर्च २४.४२ टक्के, ४३.२३ टक्के आणि ४३.६ टक्के इतका आहे.

पाच आर्थिक वर्षामध्ये एकाही वर्षी त्या त्या आर्थिक वर्षमधील शिक्षणासाठी केलेल्या एकूण तरतूदींच्या १०० टक्के खर्च झालेला नाही. फार मोठया प्रमाणावर रक्कम अखर्चित आहे. म्हणजेच तरतूद करून भागणार नाही तर ती रक्कम त्या त्या आर्थिक वर्षामध्येच १०० टक्के खर्च करण्याकडे लक्ष न दिल्यास ज्यांच्यासाठी व ज्या उद्दिष्टांसाठी रकमेची तरतूद केली आहे ते लाभार्थी या लाभापासून वंचित राहतील.

पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०११–१२ ते २०१५–१६ या आर्थिक वर्षामध्ये वर्षनिहाय केलेल्या शिक्षणविषयक आर्थिक तरतूदींच्या रक्कमेशी व प्रत्यक्ष खर्चाच्या रकमेची तुलना केलेली आहे. त्यावरून असे लक्षात येते की, सदरच्या आकडेवारीनुसार शिक्षण विभागातील शिर्षनिहाय तरतूदींचे आर्थिक वर्षनिहाय विश्लेषण

केलेले आहे. त्यावरून जिल्हा परिषदेच्या या कालखंडामधील शिक्षणासाठीचे प्राधान्यक्रम लक्षात येतात.

**मराठी संदर्भ**


१. ओझरकर, सु. रा. (२०११), राजस्व, नागपूर, विदया प्रकाशन.

२. सांळुके धैर्यशिल (२००८), महाराष्ट्राचा अर्थसंकल्प : एक दृष्टिक्षेप, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन्स.

३. गोविलकर, वि. म. (२००५), भारताचा अर्थसंकल्प अर्थ आणि अन्वयार्थ, मुंबई, ग्रंथाली प्रकाशन.

४. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०११–१२), अर्थसंकल्प, जिल्हा परिषद निधी, सन २०११–१२ चा सुधारित व सन २०११–१२ चा मूळ अर्थसंकल्प, पुणे, जिल्हा परिषद.

५. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१२–१३), अर्थसंकल्प, जिल्हा परिषद निधी, सन २०१२–१३ चा सुधारित व सन २०१२–१३ चा मूळ अर्थसंकल्प, पुणे, जिल्हा परिषद.

६. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१३–१४), अर्थसंकल्प, जिल्हा परिषद निधी, सन २०१३–१४ चा सुधारित व सन २०१३–१४ चा मूळ अर्थसंकल्प, पुणे, जिल्हा परिषद.

७. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१४–१५), अर्थसंकल्प, जिल्हा परिषद निधी, सन २०१४–१५ चा सुधारित व सन २०१४–१५ चा मूळ अर्थसंकल्प, पुणे, जिल्हा परिषद.

८. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१५–१६), अर्थसंकल्प, जिल्हा परिषद निधी, सन २०१५–१६ चा सुधारित व सन २०१५–१६ चा मूळ अर्थसंकल्प, पुणे, जिल्हा परिषद.

९. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०११–१२), प्रदाने लेखाशीर्ष, जिल्हा परिषद निधी, सन २०११–१२ चा खर्च, पुणे, जिल्हा परिषद.

१०. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१५–१६), प्रदाने लेखाशीर्ष, जिल्हा परिषद निधी, सन २०१५–१६ चा खर्च, पुणे, जिल्हा परिषद.

११. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१५–१६), प्रदाने लेखाशीर्ष, जिल्हा परिषद निधी, सन २०१५–१६ चा खर्च, पुणे, जिल्हा परिषद.

१२. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१५–१६), प्रदाने लेखाशीर्ष, जिल्हा परिषद निधी, सन २०१५–१६ चा खर्च, पुणे, जिल्हा परिषद.

१३. वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१५–१६), प्रदाने लेखाशीर्ष, जिल्हा परिषद निधी, सन २०१५–१६ चा खर्च, पुणे, जिल्हा परिषद.